दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र | गुरुवार दि.१४ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -८३ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## मशाल ही क्रांतीची नव्हे,तर घरे जाळण्यासाठी घेतली आहे-मुख्यमंत्री शिंदे

**वैजापूर**-दि. ११ नोव्हेंबर रोजी वैजापूर येथील आमदार रमेश बोरणारे यांच्या प्रचारसभेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शक्तीशाली भाषण केले. त्यांनी विरोधकांना घेरताना, मशाल हे चिन्ह क्रांतीसाठी नव्हे, तर लोकांची घरे जाळण्यासाठी वापरले जात असल्याचे वक्तव्य केले. मुख्यमंत्री शिंदे यांचे म्हणणे होते की, विरोधक हे केवळ बोरणारे सर यांचे काम पाहून बोलतात. त्यांना फक्त खालच्या पातळीवर बोलता येते, गद्दाराची भाषा वापरली जाते, पण गद्दार कोण हे त्यांना समजत नाही. ते पुढे म्हणाले की, आमदार बोरणारे यांनी जातीपातीचे राजकारण न करता सर्वसमावेशक विकास केला आहे. त्यांच्या कामांची तारीफ करतांना विरोधकांना हे दिसत नाही.माजी आमदार भाऊसाहेब तात्याची चिकटगावकर यांनी आदित्य ठाकरे यांच्या शिऊर येथील सभेबद्दल सांगितले की, आदित्य ठाकरे यांना त्यांच्या आराध्य दैवत श्री शंकर स्वामी आणि बहिणाबाई यांच्या मंदिरात जाऊन दर्शन घ्यायला वेळ मिळाला नाही, पण ते म्हणतात की बोरणारे सर जातीपातीचे राजकारण करत आहेत.मुख्यमंत्री शिंदे यांनी वैजापूरमधील ३००० कोटी रुपयांच्या विकासकामांचा उल्लेख केला आणि आगामी योजनांची माहिती दिली. त्यांनी रामकृष्ण गोदावरी जलसिंचन योजना व दहेगाव प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

# भाजपची मस्ती वाढलीये:आमचे दोन आमदार होते,ते देखील त्यांनी पळवले-महादेव जानकर

**पुणे (वृत्तसंस्था)**
एकेकाळी महायुतीचा घटक पक्ष असलेले राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी मित्रपक्ष भाजपवर सडकून टीका केली आहे. भाजपची मस्ती वाढली आहे. आमचे दोन आमदार होते, ते देखील त्यांनी पळवले, असे सांगताना महादेव जानकर यांना संताप अनावर झाला होता.महादेव जानकर बारामती मतदारसंघातील काटेवाडी कण्हेरी येथे आयोजित सभेत बोलत होते. मी खासदार मंत्री झालो ते आपल्या चिन्हावर झालो मी दुसऱ्यांच्या चिन्हावर झालो नाही. मी घोटाळा अन् चोऱ्या केल्या असत्या तर माझ्याही मागे ईडी लावली असती. मला म्हणले असते तुम्हाला आमच्याबरोबर राहावे लागेल, नाहीतर आत टाकू, अशी टोलेबाजी महादेव जानकर यांनी केली.

पुढे बोलताना महादेव जानकर यांनी भाजपवरही जोरदार निशाणा साधला. भाजपची मस्ती वाढली आहे. त्यांनी काय केले. त्यांनी शिवसेना फोडली, राष्ट्रवादी फोडली. कुठला माणूस कुठ ठेवाला नाही. आमचे एक दोन आमदार होते, ते आमदार पण आमचे पळवले. आमचा आमदार निवडून येतो आमच्या पक्षावर आणि तुम्ही भाजप बरोबर घेऊन जाता, असे म्हणत जानकर यांनी आपल्याच मित्रपक्षाला खडेबोल सुनावले.महादेव जानकर यांनी काही दिवसांपूर्वी महायुतीतून बाहेर पडून वेगळी चूल मांडली. जानकर यांनी आपल्या पक्षासाठी महायुतीकडे ४० ते ५० जागांची मागणी केली होती. मात्र त्यांना महायुतीकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे त्यांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला असे म्हटले जात होते. दरम्यान, मी महायुती किंवा महाविकास आघाडी कुणावरही नाराज नसल्याचे महादेव जानकर यांनी सांगितले होते. आमचा पक्ष देशात मोठा झाला पाहिजे. त्यासाठी आम्ही स्वतंत्र लढणार असल्याचे महादेव जानकर यांनी सांगितले होते.महादेव जानकर यांना धनगर समाजाचा मोठा पाठिंबा आहे. महादेव जानकर यांच्या पक्षाची सोलापूर, बारामती, परभणी, बीड, जालना आणि कर्नाटक लगतच्या प्रदेशात मोठी ताकद आहे. धनगर समाजाची संख्या जास्त असलेल्या मतदारसंघात महादेव जानकरांच्या पक्षाला चांगला पाठिंबा आहे.



# गंगापुर खुलताबाद मतदारसंघात महिलांसाठी एमआयडीसी सुरू करणार: आ.प्रशांत बंब

**छ. संभाजीनगर | प्रा संजय तुपे**
जायकवाडी धरणात पाणी येण्यासाठी मी पश्चिम महाराष्ट्रातील नेते अंगावर घेतले त्यांच्या विरोधात हक्याच्या पाण्यासाठी लढलो, आता दरवर्षी या धरणात वरील धरणारतून पाणी येत आहे. त्याचा फायदा म्हणजे मतदारसंघात औद्योगिकरणांत झपाट्याने वाढ होत असून आता महिलांसाठी वेगळी एमआयडीसी तयार करणार असल्याचे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार आमदार बंब यांनी केले.



बोरगाव येसगाव डोमेगाव या ठिकाणी महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत बंब यांची प्रचारसभा घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. धरणात आता आपल्या हक्काचे पाणी येत आहे. गंगापूर तालुक्यातील शेनपुंजी रांजणगाव, वाळूज पासून ते भेंडाळ्यापर्यंत आणि ए एस क्लब रस्त्यापासून ते गवळीशीवरा आरापूर पर्यंत औद्योगिकरणात भर पडत असून झपाट्याने वाढत देखील आहे. याचाच धागा धरून मला आता महिलांसाठी काम करायचे आहे. पुरुषांप्रमाणेच महिलांनाही समान संधी मिळावी, ग्रामीण भागातील महिलांनीही अशक्य गोष्टी शक्य करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि म्हणूनच मी आता मतदारसंघात महिलांसाठी वेगळी एम आय डी सी सुरू करणार आहे. यासाठी थोडा वेळ लागेल परंतु त्यासाठी मी प्रयत्न सुरू केले आहेत. माझा मतदार संघ राज्यासाठी मॉडेल करणार आहे. जास्तीत जास्त महिलांना उद्योग व्यवसायात क्षेत्रात उतरवून त्यांना अधिक अधिक पैसेवाले बनवणार असून त्यांचे अर्थिक उत्पन्न वाढवून मतदारसंघात महिलांसाठी उद्योग व्यवसाय वाढणार असल्याचे त्यांनी सांगून कमळ या निशाणीवर फुलीचा ठसा मारून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन गावगावतील मतदारांना केले. दरम्यान यावेळी मोठ्या संख्येने मतदार बांधव उपस्थित होते.

# दलित नेते अशोक गायकवाड यांचा नमिता मुंदडा यांना पाठिंबा


## असंख्य कार्यकर्त्यासमवेत नंदकिशोर मुंदडा यांचे फुलेनगर मध्ये जंगी स्वागत

**केज | सचिन भालेराव**
दलित आन्याय अत्याचार निर्मुलन समितीच्या माध्यमातून केज शहर तथा तालुक्यात कार्य करून सामाजिक कार्यात अग्रस्थानी असणारे दलित नेते अशोक गायकवाड यांनी महायुतीच्या उमेदवार सौ. नमिता मुंदडा यांना बिनशर्त पाठिबा दिला आहे.



याबाबत वृत्त असे की केज शहरातील फुले नगर येथील वार्ड क्रमांक ७,८,९ येथुन आपल्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून केज शहर तालुक्यात आपल्या कार्याचा ठसा उमटवत तसेच दलित आन्याय आत्याचार निर्मुलन समिती केजच्या माध्यमातून केज शहर तथा तालुक्यातील विविध स्वरूपांच्या दलितांच्या समस्या सोडविण्याचे कार्य करणारे अशोक गायकवाड यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्या समवेत फुले नगर येथील एलएफसी चौक येथे केज तालुक्याचे जेष्ट सामाजीक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांचे जोरदार स्वागत करून भाजपाच्या केज विधानसभेच्या आमदार नमिता मुंदडा यांना पाठींबा दिला आहे. यावेळी सौ.नमिता मुंदडा यांना फुलेनगर वार्ड क्रमांक ७, ८ व ९ मधुन जास्तीत जास्त लिड देऊन निवडून आनु असे अभिवचन दलित नेते अशोक गायकवाड यांनी दिले. यावेळी फुलेनगर मधील तथा हाऊसीग कॉलनी वार्ड क्र.७,८,९ मधील असंख्य तरुण, वृद्ध, महिला उपस्थित होत्या.

# शॉर्ट सर्किटने आग लागून २ लाखांचे नुकसान



**जालना | असलम कुरेशी**
घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील एका मोटार रिवायडींगच्या दुकानाला शॉर्ट सर्किटने आग लागून दोन ते अडीच लाखांचे नुकसान झाले. सुदैवाने शेजारील दुकानात आग न पोहोचल्याने मोठा अनर्थ टळला.

रांजणी येथील जावेद शाह साबेर शाह हे दुकानदार मोटार रिवायडिंग दुकान चालवुन संसाराचा गाडा चालवत होते. सध्या ज्वारी, गहू व कांद्याच्या पेरणीमुळे मोठ्या प्रमाणात जळालेल्या विद्युत मोटारी दुरुस्तीचे काम सुरु असल्याने जावेद शाह यांनी एक ते दीड लाखाचे साहित्य खरेदी करून ठेवले होते. तसेच अनेक शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारी व इतर साहित्य दुकानात होते. मंगळवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास जावेद शाह दुकान बंद करून घरी गेले. दरम्यान रात्री अचानक शॉर्ट सर्किट होऊन दुकानात आग लागली. सकाळी दुकानांमध्ये धुर व जाळ दिसु लागल्याने आजु बाजुचे नागरीक जमा झाले. या शॉर्ट सर्किटमुळे जावेद शाह यांच्या दुकानातील मोटार भरण्याचे साहित्य, जुन्या विद्युत मोटारी व इतर साहित्य जळून सुमारे दोन ते अडीच लाखाचे नुकसान झाले. जावेद शाह यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्यामुळे त्यांना प्रशासनाच्या वतीने नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

# अपक्ष उमेदवार डॉ.सुरेश सोनवणे यांना भास्करराव पेरे पाटील यांचा जाहीर पाठिंबा

**छ.संभाजीनगर | प्रा संजय तुपे**
विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ .गंगापूर खुलताबाद मतदारसंघातील अपक्ष उमेदवारडॉक्टर सुरेश सोनवणे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून गावोगावी पदयात्रा काढून विकास कामे करण्यासाठी निवडून देण्याचे आवाहन केले. ह्या आवाहनाला प्रतिसाद देत पाटोदा गावचे आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी

अपक्ष उमेदवार सुरेश सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. भास्करराव पेरे पाटील म्हणाले की सध्या महाराष्ट्रातील गोरगरीब जनता मतदान कोणाला करावे याबाबत संभ्रमात आहे आपल्या गंगापूर खुलताबाद तालुक्यामध्ये ग्रामीण भागाची परिस्थिती अतिशय दयनीय आहे रस्ते, दवाखाने, शाळा यांची परिस्थिती पाहिली तर गंगापूर खुलताबाद तालुक्यात बदल करणे गरजेचे आहे त्यामुळे डॉ. सुरेश सोनवणे हे ग्रामीण भागातील भूमिपुत्र उमेदवार असून त्यांच्याकडे गावांचा विकास करण्याची दुरदृष्टी आहे व तसा शब्द सोनवणे यांनी मला दिला असल्याने विधानसभेसाठी मी त्यांना जाहीर पाठिंबा देत असल्याचे गंगापूर खुलताबाद सांगून तालुक्याचे विकासासाठी



डॉ. सुरेश सोनवणे यांना प्रचंड मतानें विजयी करण्याचे आवाहन मतदार संघातील गावकऱ्यांना केले आहे. डॉ. सुरेश सोनवणे (अपक्ष उमेदवार, गंगापूर / खुलताबाद) वगंगापूर खुलताबाद मतदार संघात माझ्या विरोधात दोन उमेदवार असून एक पंधरा वर्षांपासून आमदार आहे तर एक १७ वर्षांपासून पदवीधर आमदार आहे मात्र गंगापूर खुलताबाद मतदारसंघांमध्ये विकास हरवला आहे. मी उच्चशिक्षित असून स्थानिक उमेदवार आहे त्यामुळे जनतेसमोर मी एक उत्तम पर्याय आहे व २३ तारखेला मीच विजयी होऊन गंगापूर खुलताबादचा आमदार असेल मी आमदार झाल्यानंतर सर्वांत प्रथम ग्रामीण भागातील शेत रस्ते, पानंद रस्ते, जिल्हा परिषद शाळेची सुधारणा आदी करणार असून आरोग्य, शिक्षण, रोजगार या विषयावर काम करणार आहे आदर्श गावचे सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी मला जाहीर पाठिंबा दिला असून अजूनही भरपूर चांगले असणारे व्यक्तिमत्व माझ्याशी जोडणार आहे

# शरद पवारांचा हल्लाबोल:जनतेने आमच्या जास्त जागा निवडून दिल्या म्हणून मोदींना संविधान बदलता आले नाही

**जळगाव (वृत्तसंस्था)**
लोकसभा निवडणुकीत भाजपने ४०० पारचा नारा दिला होता. त्यावर भाजपला बहुमत मिळाले तर संविधान बदलतील, अशी शंका विरोधकांकडून उपस्थित करण्यात आली. तसेच भाजप संविधान बदलणार म्हणत विरोधकांनी जोरदार प्रचार सुरू केला होता. जळगाव येथील प्रचार सभेत शरद पवारांनी यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले ४८ पैकी ३१ जागा तुम्ही आम्हाला लोकसभेत निवडून दिल्या म्हणून मोदींचा संविधान बदलण्याचा डाव फासला, असे शरद पवार म्हणाले.

सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणात बदल करण्याचा विचार आम्ही करत आहोत, हे तुमच्याशिवाय शक्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेच्या निवडणुकीवेळी ४०० खासदार पाहिजेत असे म्हणत होते. तेवढे लागत नाही पण लोकांना शंका आली. यात काही काळबेरं दिसत आहे. ४०० पार जागा मिळत नाहीत तोपर्यंत घटना बदलता येणार नाही अशी माहिती देखील त्यांच्याच लोकांनी सांगितली होती, असे शरद पवार म्हणाले.

शरद पवार म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान बदलण्याचे यांच्या मनात पाप होते. याबाबत लोकांमध्ये जागृती करण्यात आली. त्यासाठी आम्ही सर्व एकत्र येत इंडिया आघाडी तयार केली. सर्वांना एकत्र केले, वाटेल ते करू पण घटना बदल करू देणार नाही, असा निश्चय आम्ही केला, असे पवार म्हणाले.केंद्र सरकारवर टीका करताना शरद पवार म्हणाले, चंद्रबाबू नायडू आणि नितेश कुमार यांना सोबत घेत सरकार स्थापन केले. काय केले सरकार स्थापन करून? कोणते निर्णय घेतले? काय अवस्था आहे देशातल्या शेतकऱ्यांची, देशातील तरुणांची आणि भगिनींची काय अवस्था आहे. एका वर्षात ९०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्याच्या मालाला किंमत देत नाही, जो माल पिकवतो त्याला त्याच्या उत्पादनानुसार नाव मिळत नाही, अशी टीका पवारांनी केली आहे.



संपादकीय

# अलिप्ततेची सत्त्वपरीक्षा



इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष भारताच्या हिताचा नाही. इराणने क्षेपणास्त्रांचा तुंबळ मारा केल्यानंतर राजकीय नवसंजीवनी मिळालेले इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी 'इराणला याची किंमत चुकवावी लागेल,' असे म्हटले आहे. इस्रायलने लगेच टोल्याला प्रतिटोला असे न करता काहीशी वाट पाहण्याचे ठरविलेले दिसते. इस्रायल इराणी तेलविहिरी तसेच तेल शुद्धीकरण प्रकल्प उद्ध्वस्त करण्याचा विचार करीत आहे; असे म्हणतात. असे झाले तर जगाचा तोटा होईल तो होईलच; पण भारताच्या अर्थकारणाला आणि एकूण विकासाच्या वाटचालीला तो जबर फटका असेल.

अनेकदा इराणकडून आयात होणाऱ्या तेलाचे प्रमाण गरजेच्या दहा टक्क्यांच्या वर असते. रशिया-युक्रेन यांच्या संघर्षात जसे भारताने दबावाला बळी न पडता रशियाकडून तेल घेणे थांबविले नाही, तसेच 'इराणकडून तेल घेऊ नका,' हे जागतिक दादांचे फर्मानही आपण कधी ऐकले नाही. अर्थात, इराणी तेलविहिरी उद्ध्वस्त करण्यापूर्वी इस्रायलला दहादा विचार करावा लागेल. ताजा आखाती संघर्ष सुरू झाल्यापासून तेलाच्या किमती एकदा तीन व एकदा दोन अशा पाच टक्क्यांनी वधारल्या आहेत. जगभर शेअर बाजारांना हुडहुडी भरते आहे. थोडी जरी अस्थिरता आली तरी लगेच सोने वधारते. तसे होते आहे. या साऱ्या घटनाक्रमात आधी युद्धग्रस्त इराणचे आणि नंतर इतर आखाती देशांमधील खनिज तेल भारताला मिळाले नाही तर मोठाच अनवस्था प्रसंग उभा राहील. तशी दुश्चिन्हे दिसत आहेत.इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली असतानाच इराणी बंदरांजवळ इराण आणि भारत यांच्या नौदलांचा संयुक्त युद्धसराव सुरू झाला आहे. असे युद्धसराव अचानक होत नाहीत आणि त्यांची तयारी अनेक महिने सुरू असली तरी आखातात संघर्ष पेटल्यानंतर भारताने हा युद्धसराव रद्द केला नाही; हे लक्षात घ्यावे लागेल. मोठ्या युद्धाचे काळे-कभिन्न ढग आखाती आकाशात भरून आलेले असताना भारताच्या युद्धनौका आखातात असणे; याला अतिशय महत्त्व आहे. हा औपचारिक युद्धसराव संपल्यानंतर इराणच्या विनंतीने किंवा स्वत:हून भारतीय युद्धनौका इराणी सागरातला मुक्काम वाढवितात का, हे पाहावे लागेल. इराण व इस्रायल यांच्या संवादासाठी भारत प्रयत्न करेल का, या प्रश्नावर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी परवा होकारार्थी उत्तर दिले. मात्र, भारताला रशिया व युक्रेन यांच्या संघर्षात अशी कोणतीही भूमिका अद्याप बजावता आलेली नाही. तेव्हा इराण व इस्रायल आपले ऐकतील, असा समज करून घेण्यात काही अर्थ नाही. अर्थात, हा संघर्ष टळला तर जागतिक शांतीइतकाच भारतीय अर्थकारण वाचविण्याचा प्रमुख उद्देशही साध्य होणार आहे. युक्रेन-रशिया युद्धाचा मोठा फटका भारताला आज बसतो आहे. आखाती संघर्ष अधिक पेटला तर तो कित्येक पटींनी वाढेल.अण्वस्त्रसज्जता कबूल न करणाऱ्या इराणने चार वर्षांपूर्वीही इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली होती. इस्रायलने इराणी अधिकाऱ्यांना टिपणे, स्फोट घडवून आणणे अशी माफक उत्तरे तेव्हा दिली तरी सुदैवाने थेट युद्धास तोंड फुटले नव्हते. तसेच यावेळीही होऊ शकते. दुसऱ्या महायुद्धानंतर 'मर्यादित युद्ध' (लिमिटेड वॉर) अशी संकल्पना विकसित झाली. (पुढे अमेरिकेने ती 'मर्यादित अणुयुद्ध' अशी ताणली.) असे मर्यादित युद्ध झाले तर प्रत्युत्तर देण्याची खुमखुमी भागते; तशीच आपल्या ताकदीची नेमकी कल्पनाही शत्रूला करून देता येते. तेव्हा सर्वंकष युद्धाच्या वाटेला न जाता गेली अनेक दशके चालू असणारी खडाखडी इराण व इस्रायल कायम ठेवतात, की यावेळी मात्र टोकाला जातात, यावर सारे अवलंबून आहे. अमेरिकी अध्यक्ष जाहीरपणे काहीही बोलत असले तरी असे युद्ध न होण्यासाठी अमेरिकेने इस्रायलवर दबाव टाकणे, आवश्यक आहे. आज आखातात इस्रायल अनेक आघाड्यांवर लढत आहे. मात्र, देशात मनुष्यबळाचा तुटवडा पडतो आहे.भारतासहित इतर देशांमधून विविध प्रकारचे कर्मचारी मागवावे लागत आहेत. त्यातच इराणकडे अणुबॉम्ब आहे आणि तिथल्या शिया राज्यकर्त्या धर्मगुरूंच्या शहाणपणाला मध्ययुगीन संकल्पनांचे कुंपण आहे; हे विसरून चालणार नाही. थोडक्यात, या संघर्षात आपली नेमकी किती शक्ती पणाला लावायची, याचा समंजस विचार इस्रायलला करावा लागेल. इराण काही वर्षांत अनेक अंगांनी कमकुवत झाला आहे आणि तो भासवतो तितका बलिष्ठ नाही; असे अनेक अभ्यासक मानतात. हे खरे असेल तर इराणची शिल्लक ताकद इतर अनेक मार्गांनीही संपवता येईल. त्यासाठी युद्ध कशाला? इराण हा जुना मित्र आणि दुसरीकडे इस्रायली मैत्रीची ओढ; या दुविधेत भारताच्या अलिप्ततेची नवी सत्त्वपरीक्षा सुरू झाली आहे. दोन्ही मित्रांचे हात पकडून त्यांना थांबविण्याइतकी ही अलिप्तता अजून शक्तिशाली झालेली नाही; ही बोच या निमित्ताने अधिक ठळक होते.

# सुखद स्वयंप्रज्ञेचे सुचिन्ह!



बुद्धिबळपटू हरिका द्रोणावल्लीपुढे आता दोन वैयक्तिक, कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत. बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेमुळे पुढे ढकलल्या गेलेल्या आई आणि आजीच्या गुडघेरोपण शस्त्रक्रियांच्या तारखा ठरवून त्या लवकरात लवकर करून घेणे आणि लेक हन्विकाच्या दुसऱ्या वाढदिवसाची तयारी. हरिका 'परफेक्शनिस्ट' असल्याने यात कोणतीही हलगर्जी होणार नाही, याची सर्वतोपरी दक्षता तिला घ्यायची आहे; अगदी तशीच, जशी तिने बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या निर्णायक सामन्यातील डावात अझरबैजानच्या गुनाय मम्मदझादाशी पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना घेतली होती. अखेरच्या या अकराव्या फेरीत हरिका पहिल्या पटावर खेळत होती आणि तिचा या डावातील विजय महिला संघासाठी फार महत्त्वाचा होता. नागपूरची दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल यांनीही विजय मिळवले, तर आर. वैशालीला बरोबरीवर समाधान मानावे लागले. पण तोवर भारतीय महिला संघाचे सुवर्णपदक निश्चित झाले होते. जागतिक बुद्धिबळाच्या पटावरील अत्यंत प्रतिष्ठेच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णयश संपादन करून भारताने बुद्धिबळविश्वातील महासत्ता होण्याच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. यात पुरुष संघाचा खुल्या स्पर्धेतील विजय वर्चस्व सिद्ध करणारा होता, तर खडतर परिस्थितीतून वाट काढत महिला संघाने मिळवलेल्या सुवर्णपदकामुळे या यशाची झळाळी आणखी वाढली.

बुद्धिबळाच्या पटावरील भारताचे हे वर्चस्व खचितच सुखद आहे. एरवी आपण क्रिकेटप्रेमात इतके आकंठ बुडलेले आहोतच. पण नव्या शतकाच्या सुरुवातीपासून ही परिस्थिती धिम्या गतीने बदलू लागली आणि इतरही खेळांना प्रोत्साहन मिळू लागले. त्यात जसा विविध क्रीडाप्रकारांत झालेला नव्या प्रतिभावान खेळाडूंचा उगम हे एक कारण, तर त्यांचा खेळ दाखविणाऱ्या आणि त्याद्वारे तो पाहणारे प्रेक्षक निर्माण करणाऱ्या संपर्क साधनांचा विस्तार हे दुसरे. क्रिकेटपायी या खेळांचा अगदीच अनुल्लेख व्हायचा, तो टळून त्याकडे लक्ष जाण्याइतपत आपलीही प्रेक्षक म्हणून कामगिरी सुधारली आहे. बुद्धिबळासारख्या- पाहण्यासाठीही मोठ्या संयमाची मागणी करणाऱ्या - खेळातील यश साजरे होणे, हे त्या अर्थाने दिलासादायक.

बुद्धिबळ म्हणजे तत्कालीन सोव्हिएत महासंघ, त्यातून फुटलेले देश, रशिया, अमेरिका, हंगेरी आणि अलीकडच्या काळात चीन या प्रबळ देशांची मक्तेदारी. यंदा ती मोडण्याचा पराक्रम करताना भारताने, विशेषत: पुरुष संघाने खुल्या गटात जे वर्चस्व गाजवले, ते पाहून भारतीयांची मान अभिमानाने ताठ होईल. ऑलिम्पियाडमध्ये खेळाव्या लागणाऱ्या ११ फेऱ्यांत जास्तीत जास्त २२ गुण मिळू शकतात, अशा वेळी भारताच्या पुरुष संघाने २१ गुण मिळवून जेतेपद खेचले. आपल्या मागचा दुसरा संघ १७ गुणांवर आहे, हे पाहिल्यावर या यशाची महत्ता अधिक ठसठशीतपणे दिसेल. दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे अमेरिका आणि उझबेकिस्तान आहेत, तर चीन चौथ्या क्रमांकावर आहे. पुरुष संघाने ११ पैकी १० फेऱ्या जिंकल्या आणि १ बरोबरीत सोडवली, म्हणजे एकही पराजय न स्वीकारता हे जेतेपद मिळवले, हे आणखी विशेष. महिला संघाचे ११ फेऱ्यांत १९ गुण आहेत, ते पोलंड आणि अमेरिकेविरुद्ध हार पत्करल्यानंतरही जिद्दीने खेळून अखेरच्या फेरीत केलेल्या कामगिरीमुळे आहेत, हे लक्षात घेतले, तर महिला संघाने विजय अक्षरश: खेचून आणला आहे, हे अधोरेखित होईल. एकाच ऑलिम्पियाडमध्ये दोन्ही सांघिक स्पर्धा जिंकण्याचा प्रसंग २०१८ नंतर पहिल्यांदा घडला आणि असे दुहेरी यश आतापर्यंत फक्त तत्कालीन सोव्हिएत महासंघ, रशिया, अर्मेनिया, हंगेरी आणि अमेरिका यांनीच मिळवले आहे. म्हणजे असे वर्चस्व गाजवणारा भारत हा केवळ सहावा संघ आहे.गेली बरीच वर्षे भारताचा जागतिक बुद्धिबळविश्वातील दबदबा एखाद्या नावापुरता मर्यादित होता. अभिजित कुंटे, रघुनंदन गोखले, प्रवीण ठिपसे, मृणालिनी कुंटे, भाग्यश्री ठिपसे या मराठी नावांची मोहोर बुद्धिबळ पटावर होती. पण, जगज्जेतेपद मिळवल्याने विश्वनाथन आनंद हे त्यातील सर्वांत ठळक. मराठी जनांसाठी अभिमानाची गोष्ट म्हणजे जयश्री खाडिलकर यांनी १९७९ मध्ये महिला इंटरनॅशनल मास्टरचा मिळवलेला किताब. भारताने आतापर्यंत ८४ ग्रँडमास्टर निर्माण केले. विश्वनाथन आनंद हा पहिला. म्हणजे सगळे ग्रँडमास्टर घडले आहेत, ते गेल्या साडेतीन दशकांत. आनंदचे महत्त्व अधिक, कारण बुद्धिबळातही कारकीर्द होऊ शकते, यावर अनेकांचा विश्वास त्याला पाहून बसला. ज्या पुरुष भारतीय संघाने यंदाच्या ऑलिम्पियाडमध्ये जेतेपद मिळवले, त्यातील अर्जुन एरिगसी, डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद हे जेमतेम विशीत आहेत, तर २०१८ मध्ये 'लोकसत्ता तरुण तेजांकित'ने सन्मानित झालेला नाशिकचा विदित गुजराथी आता तिशीत. आनंद हा या सगळ्यांची कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर प्रेरणा. आनंद ग्रँडमास्टर झाला, तेव्हा यापैकी कुणाचा जन्मही झाला नव्हता. आज आनंद त्यांचे तोंड भरून कौतुक करण्यासाठी पुढे आला आहे. 'ऑलिम्पियाडमध्ये कोणत्याही संघाने यापूर्वी असे वर्चस्व गाजवल्याचे माझ्या तरी स्मरणात नाही,' हे आनंदचे उद्गार बुद्धिबळातील आपले भविष्य किती उज्ज्वल आहे, याची साक्ष देणारे आहेत.सारे जग आश्चर्यमिश्रित कौतुकभरल्या नजरांनी भारतीय संघाकडे पाहते आहे आणि त्यात महिला संघाचीही प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. कोनेरू हम्पी पहिली भारतीय महिला ग्रँडमास्टर झाली, ती एकविसाव्या शतकाच्या अगदी सुरुवातीला. त्याला दोन दशके होत असताना आपण जागतिक दर्जाच्या स्पर्धेत जेतेपद मिळवणे खूपच प्रशंसनीय. हम्पी या वेळच्या ऑलिम्पियाडमध्येही खेळली असती, पण वैयक्तिक कारणांसाठी तिने माघार घेतली. त्या वेळी महिला संघात अनुभवी बुद्धिबळपटू हवी, म्हणून प्रशिक्षक अभिजित कुंटे यांनी हरिकाला विनंती केली आणि तिनेही ती मान्य करून संघाच्या यशात आपला अनुभव पणाला लावला. हरिका आपल्या दोन वर्षांच्या मुलीशी स्पर्धेदरम्यान दूरध्वनीवरून बोललीही नाही, ते खेळताना भावनाशीलता बाजूला राहावी म्हणून. तिच्या या समर्पित वृत्तीला जेतेपदापेक्षा मोठे पारिश्रमिक काय असू शकते? महिला संघातील वैशालीसाठीही हे यश असेच मोठे, कारण पुरुष संघातील प्रसिद्ध बुद्धिबळपटू प्रज्ञानंदची बहीण यापेक्षा तिला तिची स्वतंत्र ओळख हवी होती, ती यामुळे मिळाली आहे. यंदाच 'लोकसत्ता तरुण तेजांकित' ठरलेल्या नागपूरच्या दिव्या देशमुखने तर सुवर्णपदक जिंकून सांघिक यशाला वैयक्तिक कामगिरीचीही सोनेरी किनार जोडली आहे.बुद्धिबळ हा अस्सल भारतीय खेळ, पण रशिया आणि तत्कालीन सोव्हिएत महासंघ, तसेच पूर्व युरोपातील देशांनी वर्षानुवर्षे त्यावर अधिराज्य गाजवले. अमेरिकाही फार मागे राहिली नाही आणि चीननेही गेल्या काही काळात मुसंडी मारली. एकच घर पुढे सरकणाऱ्या प्याद्यापासून तिरकी चाल करणारा उंट, अडीच घरे उड्या मारणारा घोडा आणि कसाही सरकू शकणाऱ्या वजिरापर्यंतचे मोहरे खेळवणारे बुद्धिबळ शीतयुद्धाच्या काळात हेरगिरीपर्यंत जाऊन पोहोचले होते. अलीकडच्या काळात 'नेटफ्लिक्स'वरच्या 'क्वीन्स गॅम्बिट' या मालिकेमुळे या खेळाला वलय आले आणि नंतर त्याची महिलांचा बुद्धिबळातील सहभाग ते त्यांच्या पेहरावावरून व्यक्त केली जाणारी मते, अशा विविधांगाने चर्चा होऊ लागली. पण, त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते ते भारताने या खेळात सांघिक जेतेपद मिळवणे. ते आता साध्य झाले आहे. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने संघांना सव्वातीन कोटींचे पारितोषिक जाहीर केले, तेही औचित्याचे. कृत्रिम प्रज्ञेच्या आजच्या प्रभावकाळातही मानवी बुद्धीच्या लखलखण्याला इतके मोठे जागतिक परिमाण आहे आणि त्यात भारत अग्रेसर आहे, हे सुचिन्ह.

# चीनचा खासगी तलाव?



सर्व जगाचे लक्ष पश्चिम आशियातील रणधुमाळीकडे असताना आपल्या पूर्वेला तेवढ्याच महत्वाचा संघर्ष सुरू आहे. दक्षिण चीन उपसागरातील अक्षरशः ठिपक्यांसारखी लहान बेटे आणि काही ठिकाणी फक्त खडक यांच्यावर कुणाचे नियंत्रण आहे किंवा असावे याबद्दल आक्रमक शह-काटशह अशा जीवघेण्या हालचाली चालू आहेत आणि याच्या मध्यभागी बलाढ्य चीन आपल्या लहान शेजारी देशांशी लढायला तयार आहे. भारताचा क्वाड संघटनेत सक्रिय सहभाग आणि हल्लीच अमेरिकेत अध्यक्षांच्या पुढाकाराने झालेल्या चर्चा, यांच्यामुळे शासनाला त्याची किती जाणीव आहे हे दिसून येते. प्रथम समस्या समजून घ्यावी. वादाचा उगम दुसरे महायुद्ध संपल्यानंतरचा आहे. युद्धकाळात जपानने दक्षिण चीन सागराच्या भोवतालच्या चीनसह सर्व देशांना आपल्या वसाहती बनवल्या होत्या.

जपानचा युद्धात पराभव झाल्यानंतर एक एक करून सर्व देश स्वतंत्र झाले. यात प्रामुख्याने कम्युनिस्ट चीन, व्हिएतनाम, फिलीपिन्स आणि मलेशिया होते. तैवान स्वतंत्र असला तरी चीनने ते कधीच मान्य केले नाही. उल्लेख केलेले सर्व देश दक्षिण चीन उपसागरावर आंतरराष्ट्रीय नियमांप्रमाणे आर्थिक वापर आणि दळणवळणासाठी आपला अधिकार आहे, असे समजतात. सर्व मान्य असले तरी चीनने उपसागराच्या बहुतांश क्षेत्रावर आपला अधिकार घोषित केला आहे व याची सीमा नकाशावर त्यांनी नऊ रेषा आखून दर्शवली आहे; जी संबंधित शेजारी देशांना मान्य नाही. शी जिनपिंग हे सन २०१४मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी वादाला अधिक धार आणली. महायुद्धात जपानने वसाहती देशांवर केलेल्या अत्याचारांमुळे त्यांनी क्षेत्रात काहीही पुढाकार घेण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे व चीन याचा पूर्ण फायदा घेऊन त्यांच्याकडे दुर्लक्ष करायची संधी सोडत नाही, याची नोंद घ्यायला हवी.

या उपसागरात दोन प्रमुख बेट समूह दिसतात. व्हिएतनामच्या ईशान्येला १३० बेटांचा पॅरासेल समूह आहे. सन १९७४मध्ये चीनने हा समूह बळकावून तिथे हवाईपट्टी बांधली आणि सैनिक तैनात केले. आज हा सर्वांत शांत आणि विनावाद प्रदेश आहे. महत्त्वाचा स्प्रॅटली बेट समूह याचा विस्तार फिलीपिन्सच्या पश्चिमेपासून दक्षिणेला बोर्निओ (मलेशिया) पर्यंत आहे व हा खरा वादाचा टापू आहे. फिलीपिन्सची राजधानी मनिला याच्या जवळची बेटे आहेत त्यांना 'स्कारबोरो शोल' म्हणतात. येथून चीनला मनिलावर नियंत्रण ठेवता येऊ नये म्हणून फिलीपिनी नौदलाने सन १९९९मध्ये 'सियेरा माद्रे' नावाची नौका जबरदस्तीने तेथील किनाऱ्यावर चढवून आपले नियंत्रण जाहीर केले. मागील वर्षी नौकेच्या निमित्ताने बांधकाम करण्यासाठी युद्धनौकांच्या ताफ्यात सामग्री पाठवली आणि चीनने त्यांना अडवले.

पुढे 'सियेरा माद्रे'वरील नाविकांचा रसदपुरवठा कमी पडू लागल्याने फिलीपिनी नौदलाने जूनमध्ये जबरदस्तीने आपल्या नौका धाडल्या. त्यावेळी चीनशी झालेल्या चकमकीत शस्त्रे वापरली गेली नाहीत; परंतु झटापटीत एका फिलीपिनी सैनिकाचा आंगठा कापला गेला. अखेर दोन्ही देशांनी सामंजस्य दाखवून वाटाघाटीत ठरवले, की रसद पुरवठा होऊ शकतो परंतु बांधकाम नाही. सध्या 'सियेरा माद्रे' आपल्या जागेवर आहे, परंतु स्थिती तणावपूर्ण आणि पुढील वाटाघाटींच्या प्रतिक्षेत आहे. फिलीपिन्सच्या दक्षिणेला 'सबिना शोल' बेट समूह आहे जिथे त्यांनी तटरक्षक नौका 'टेरेसा मॅगबुवानाला' एप्रिल महिन्यात गस्त घालण्यास तैनात केली आणि चीनने तिला बळजबरीने हटवण्यासाठी ३१ ऑगस्टला धडक देउन नौकेत भगदाड पाडले व तणाव वाढला. आता याचे पर्यवसान सशस्त्र चकमकीत होऊ नये म्हणून दोन्ही देश प्रयत्नशील आहेत.

उपसागराच्या दक्षिणेला मलेशियाचा बोर्निओ प्रांत येतो. मलेशियाला तेथे खनिज तेल व नैसर्गिक वायू यांचा शोध करायचा आहे आणि चीनचा त्याला विरोध आहे. व्हिएतनामच्या पूर्व तटाचा प्रदेश भारतासाठी महत्त्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय नियमांनुसार व्हिएतनामला तेथे मासेमारी आणि खनिज तेल शोधण्याचा हक्क आहे. चीनचा त्यासही विरोध आहे. करोना काळापूर्वी व्हिएतनामने भारताकडे खनिज तेलाचा शोधासाठी आपल्या नौकांची मदत मागितली होती व त्याप्रमाणे पुढे कारवाई सुरू होती. चीन आणि व्हिएतनाम यांच्यातील वादांमध्ये भारताला विनाकारण अडकायला नको; परंतु काही प्रसंग असे असतात ज्याच्यात भारताला माघार घेणे शक्य नाही.

पश्चिम आशियातील युद्धात जशी अमेरिकेची भूमिका निर्णायक आहे तशीच या प्रदेशातही आहे; कारण अमेरिकेने फिलीपिन्स आणि तैवान यांना गरज पडल्यास सशस्त्र मदतीची हमी दिली आहे. काही वर्षांपूर्वी चीन अधिक आक्रमक झाल्याने अमेरिकेच्या बलाढ्य विमानवाहू युद्धनौका आणि त्यांचे ताफे दक्षिण चीन उपसागरात नियमित गस्त घालत होते. अमेरिकेच्या प्रतिनिधी मंडळाच्या अध्यक्ष नॅन्सी पलोली यांनी चीनच्या कट्टर विरोधात तैवानला प्रसिद्धीच्या झोतात भेट दिली होती. त्यावेळी चीन शाब्दिक विरोधापलीकडे काहीही करू शकला नव्हता. मध्यंतरी परिस्थिती निवळल्याने अमेरिकेने गस्त घालणे कमी केले. परंतु फिलीपिनी घडामोडींमुळे त्यांचे लक्ष पुन्हा इथे वळले आहे. मूळ प्रश्न सोपा आहे - फिलीपिन्सच्या मदतीसाठी अमेरिका कितपत तयार आहे आणि याचा फायदा घेऊन फिलीपाइन्स किती संयम मर्यादा पाळू शकते. क्वाडचा सदस्य असल्याने भारतासाठी हे प्रश्न आता केवळ तात्विक उरले नसून, त्याला त्या प्रश्नांना थेट सामोरे जावे लागणारे आहेत.

भारतासमोर असे प्रसंग आता वारंवार येणार आहेत. रशिया-युक्रेन युद्धात दोन्ही पक्ष भारताच्या मध्यस्थीसाठी राजी आहेत असे समजते; परंतु यात किती तथ्य आहे, हे अद्याप उघड झालेले नाही. तसेच इस्त्रायल आणि हमास किंवा हिजबुल्ला यांच्या युद्धात भारत शांततेच्या पक्षात असला तरी काय करू शकतो किंवा करेल याबद्दल स्पष्टता नाही, परंतु क्वाड संघटनेचा सदस्य असल्याने पूर्वेकडे भारताकडून ठोस कारवाईची अपेक्षा आहे. पूर्व लडाखच्या सीमेवर आज आपले सैन्य चीनच्या विरोधात तणावपूर्ण वातावरणात सज्ज आहे. ताज्या बातम्यांनुसार काही प्रश्न सुटण्याची शक्यता दिसू लागली आहे, असे समजते. खरा मुद्दा आहे तो या पार्श्वभूमीवर भारत-चीन संबंधांची दिशा काय असावी, हा. क्वाडकडून भारताच्या सहकार्याच्या अपेक्षा आहेत. त्या प्रत्यक्ष दक्षिण चीन उपसागरात उपस्थितीच्या नसून मलाक्का सामुद्रधुनीपासून पश्चिमेला हिंद महासागरात गस्त घालून संरक्षणाच्या आहेत. भारतीय युद्धनौका जशा आफ्रिकेच्या पूर्व तटावर चाच्यांविरुद्ध कारवाई करतात त्याचप्रमाणे पूर्वेकडे सुरक्षा देण्यासाठी करतील, असे अपेक्षित आहे.भारत धोरणात्मक स्वातंत्र्य किती ठेवू शकेल, हा कळीचा मुद्दा आहे. आपले हित फक्त आपणच सांभाळू शकतो. उदा. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नुकतेच अमेरिकेचा यशस्वी दौरा करून आले. परंतु त्यांना भेटण्याआधी तेथील शासनाने काही खलिस्तानी शिख प्रतिधीनींना भेटून संरक्षणाची ग्वाही दिली. तसेच एका अमेरिकी न्यायालयाने आपल्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांना न्यायालयात हजर राहण्यासाठी फर्मान काढले होते. याला आपण काय म्हणावे? हीच स्थिती चीनच्या बाबतीत आहे. शी जिनपिंग यांचा भव्य पाहुणचार अहमदाबाद आणि नंतर माम्मलापूरम येथे पारंपारिक पद्धतीने केला; याच्यामुळे संबंध काही सुधारले नाहीत. थोडक्यात परराष्ट्र संबंधात मैत्री, पाहुणचार इ. वातावरण निर्मितीसाठी असतात. कागदावर जिथे सही होते तेच वास्तव असते, हे आपण आत्मसात केले पाहिजे.

# अजित पवार यांच्याप्रमाणे आ.कानडे देखील शब्दाला पक्के-सयाजी शिंदे

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार हे शब्दाचे पक्के आहेत. दिलेला शब्द ते पाळतात. त्याचप्रमाणे आमदार लहू कानडे हे देखील आपल्या शब्दाला पक्के आहेत. आ. कानडे हे कवी आहेत. साहित्यिक आहेत.. प्रशासकीय कामाचा त्यांना अनुभव आहे. तसेच तालुक्यातील प्रश्नांचा अभ्यास आहे. त्यामुळे येत्या २० तारखेला आपण त्यांना निवडून देऊन त्यांच्या विजयाचा गुलाल उधळावा, असे आवाहन प्रसिद्ध अभिनेते व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पक्षाचे स्टार प्रचारक सयाजी शिंदे यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार लहू कानडे यांच्या प्रचारार्थ बेलापूर येथे झालेल्या जाहीर सभेत श्री. शिंदे बोलत होते. ज्येष्ठ नागरिक कनजीशेठ टाक अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव व प्रवक्ते अविनाश आदिक, आ. कानडे, प्रदेश सरचिटणीस अरुण पाटील नाईक, जिल्हाध्यक्ष कपिल पवार, तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे, श्रीरामपूर तालुका देखरेख संघाचे अध्यक्ष इंद्रभान पाटील थोरात, भाजपाचे तालुकाध्यक्ष दीपक पटारे, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष मिस्टर शेलार, माजी सदस्य शरद नवले, बाजार समितीचे उपसभापती अभिषेक खंडागळे, सरपंच स्वाती अमोलिक यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते,




श्री. शिंदे म्हणाले, राज्यातील उत्कृष्ट राजकारणी कोण असेल तर ते अजित पवार आहेत. जे करतात ते बोलतात. आम्हीही बोलल्याप्रमाणे आ. कानडे यांना निवडून देणार आहोत. देवळालीसह या ठिकाणी मला तरुणांचा उत्साह दिसला. तरुणांनी पार्टीत रहावे, परंतु रात्रीच्या मित्रांच्या पार्टीत राहू नये, जन्मदाती आई, धरणी माता आणि वृक्ष यांच्यापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही. आपल्या आईचा नेहमी आदर करावा, असे सांगून पुढील पाच वर्षात आपल्याला वृक्ष संवर्धनाचे काम करावयाचे आहे. त्यासाठी शाळा शाळातील मुलांचे ग्रुप तयार करावे, आपण त्यांना बिया देऊ, त्यातून वृक्षांचे संरक्षण करू, असे ते म्हणाले.

आ. कानडे म्हणाले, माझ्या कुटुंबाला राजकीय वारसा नाही. पाच वर्षांपूर्वी मायबाप मतदारांनी विश्वास टाकून आमदार केले. आपण भेदभाव, गट तट, पक्ष न बघता येईल ते काम प्रामाणिकपणे केले, तेव्हाचे काँग्रेसचे आमदार टाटा करून निघून गेले. त्यावेळी काँग्रेसने उमेदवारी दिली. जनतेच्या आशीर्वादाने आपण आमदार झालो. पाच वर्षात बाराशे कोटी रुपयांची विकास कामे केली. महाविकास आघाडीत असताना तसेच महायुतीच्या सरकारात असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठ्या प्रमाणात विकास निधी देऊन सहकार्य केले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही भरभरून निधी दिला. त्यामुळे दळणवळण, वीज, शेती, युवक, महिला यांचे प्रश्न सोडवू शकलो. शेवटच्या दिवशी काँग्रेसने उमेदवारी नाकारली. चांडाळ चौकडीने कटकारस्थान करून प्रामाणिक माणसावर अन्याय केला.. हलक्या काळजाच्या नेत्यांनी त्यांचे ऐकले. त्यांना धडा शिकवण्यासाठी या निवडणुकीत आपल्याला पुन्हा संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

श्री. आदिक म्हणाले, आ. कानडे हे पारदर्शक काम करणारे आमदार आहेत. मतदारसंघात त्यांनी कोट्यावधी रुपयांची कामे केली. परंतु त्या कामातील वाटा मिळाला नाही, त्यांचे लाड पुरविले नाहीत, म्हणून जवळ असणार्यांनी कटकारस्थान करून त्यांचे तिकीट कापले. परंतु त्यानिमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसला एक कर्तबगार आमदार लाभला असून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लहू कानडे हेच महायुतीचे उमेदवार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्यांना मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अरुण पाटील नाईक, शरद नवले, अभिषेक खंडागळे, भाजपाचे प्रफुल्ल डावरे, आकाश क्षीरसागर, इस्माईल शेख, अशोक कारखान्याचे माजी संचालक जालिंदर कुऱ्हे यांची भाषणे झाली. यावेळी वळदगावचे सरपंच अशोक भोसले, राधाकृष्ण तांबे, कोंडीराम विटनोर, अनिल बिडे, विधानसभा अध्यक्ष किशोर बकाल, सुनील थोरात, ड. जयंत चौधरी, माजी सरपंच रामराव शेटे, प्रा. मच्छिंद्र पारखे, भाऊसाहेब कुताळ, जाफर आतार, दादासाहेब मेहत्रे, दीपक पवार, अक्षय नाईक, मोहसीन शेख, जमीर पिंजारी, चंद्रकांत नवले, बाळासाहेब दानी, किशोर कांबळे, मुस्ताक शेख, दीपक निंबाळकर, प्रशांत खंडागळे, चंद्रकांत नाईक, सचिन ब्राह्मणे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ खा.बजरंग सोनवणे यांचा बालाघाट गाव भेट दौरा

## पृथ्वीराज साठे यांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे मतदारांना केले आवाहन

**केज । सचिन भालेराव**

केज विधानसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ खासदार बजरंग सोनवणे यांचा बालाघाट गाव भेट दौरा संपन्न झाला, यावेळी त्यांनी अनेक गावांना भेटी दिल्या, त्याच्या सोबत अनेक कार्यकर्ते,पदाधिकारी,मान्यवर उपस्थित होते.

अनेक मान्यवरांच्या तसेच कार्यकर्त्यांच्या समवेत खासदार बजरंग सोनवणे यांनी बालाघाटावरील मौजे अंधापुरी घाट या ठिकाणी भेट दिली..

यावेळी पत्रकार दिपक वाघमारे, सरपंच,गावातील प्रतिष्ठित नागरिक,युवक ,महिला,वयोवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाकऱ्याच्या वतीने त्यांचे वाजत-गाजत स्वागत करण्यात आले तसेच शाल श्रीफळ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

गावाकऱ्यांच्या वतीने अनेक विकास कामाचे मुद्दे तसेच इतर महत्वाचे प्रश्न खासदार सोनवणे यांच्या पुढे मांडण्यात आले त्यावेळी त्यांनी गावाकऱ्यांचे म्हणणे एकूण घेत सर्व विषय मान्य करत आवाहन केले की,केज मतदार संघातील अनेक महत्वाचे प्रश्न सोडवण्यासाठी- येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार पृथ्वीराज साठे यांना प्रचंड मतांनी विजयी करावे आणि आपल्या परिसराचा विकास करण्यासाठी पृथ्वीराज साठे यांना संधी द्यावी..



# बेवारस प्रेतावर अंत्य संस्कार



**केज । प्रतिनिधी**

केज बस स्थानकाच्या परिसरात सापडलेल्या अनोळखी प्रेतावर त्याची ओळख न पटल्याने अखेर पोलिसांनी अंतिम संस्कार केले.

दि. ९ नोव्हेंबर रोजी केज येथील बस स्टँड परिसरात एक ५० वर्षीय अनोळखी पुरुष जातीचे मृतावस्थेत प्रेत आढळून आले होते. त्याची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी प्रेत उपजिल्हा रुग्णालय केज येथील शवागारात ठेवले होते. मात्र तीन दिवसा नंतर आवाहन करून देखील प्रेताची ओळख न पटल्यामुळे पोलिसांनी दि. १३ नोव्हेंबर रोजी केज येथील क्रांती नगर, कानडी रोड लगत सार्वजनिक स्मशानभूमीत अंतिम संस्कार केले.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील, पोलीस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने, पत्रकार संतोष गालफाडे, गौतम बचुटे आणि नगर पंचायतीचे कर्मचारी हजर होते.

# वीर वाजेकर महाविद्यालयात 'मतदार जागृती' विषयावर विशेष व्याख्यान

**उरण ।विठ्ठल ममताबादे**

दिनांक-१३ नोव्हेंबर २०२४ रोजी १९०-उरण विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृती अभियान या विषयावर व्याखान झाले.नरेश मोकाशी, स्वीय पथक अधिकारी म्हणून उपस्थित होते.मोकाशी यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मतदान हक्कांविषयी मार्गदर्शन केले.रुपेश पाटील यांनी आपल्या मनोगतातून आजचा तरुण आणि त्याचा मतदान हक्क,मतदान हा प्रत्येक नागरिकांचा मूलभूत अधिकार असून त्याने तो बजावला पाहिजे असे सांगितले .निर्मला मच्छीन्द्रनाथ घरत यांनी मतदार सेल्फी विषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.प्र. प्राचार्य,डॉ.आमोद ठक्कर यांनी आजच्या




तरुणांनी मतदानाविषयी सजग व जागरूक राहून आपला मतदानाचा हक्क बजवला पाहिजे,असे व्यक्त केले. यावेळेस मी मतदान करणार म्हणून नव मतदारांच्या कडुन सह्यांची मोहीम राबविण्यात आली तसेच महाविद्यालयातील मतदार विद्यार्थ्यांचे सेल्फी घेऊन मतदान करण्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.कार्यक्रमाचे आभार प्रा.राम गोसावी,राष्ट्रीय सेवा योजना चेअरमन यांनी मानले.यावेळी उपप्राचार्य डॉ.विलास महाले,प्रा.गजानन चव्हाण,प्रा.मयुरी मोहिते,प्रा.आचल बिनेदार, डॉ.झेलम झेंडे,डॉ.सुजाता पाटील उपस्थित होत्या.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# शेकापमध्ये पक्षप्रवेशाचा ओघ कायम

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण विधानसभेचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शेकापमध्ये पक्षप्रवेशाचा ओघ गेल्या काही दिवसांपासून सुरूच आहे.

सावरखार- उरणचे युवा तरुण पिढी मयूर घरत (सामाजिक कार्यकर्ता), शुभम घरत, नितीन पाटील, विकी घरत, ऋषिकेश घरत, निलेश घरत, राज ठाकूर, रोहित आहिरवाड, सुमित ठाकूर यांनी प्रितमदादांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला.पाणजे बोकडविरा गावातून प्रितम म्हात्रे याना उदंड प्रतिसाद मिळाला आहे. उरण विधानसभा मतदार संघातील शेकाप उमेदवार प्रितम जे एम म्हात्रे यांचे पाणजे -बोकडविरा गावात फटाक्याच्या आतषबाजीत उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले.



बोकडविरा येथे प्रितम जे एम म्हात्रे यांना प्रचारा दरम्यान मोठा प्रतिसाद मिळत असून बोकडविरा गावात प्रितम म्हात्रे यांनी गाव भेट दौरा केला. यावेळी घराघरातून प्रितम जे एम म्हात्रे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. प्रीतम जे एम म्हात्रे यांच्या प्रचार फेरीला आणि गाव भेट दौऱ्याला नागरिक चांगला प्रतिसाद देत आहेत. अनेक महिला, जेष्ठ नागरिक, तरुण वर्ग प्रीतम म्हात्रे यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करत आहेत. फुंडे सरपंच बिलालाशेठ याच्या नेतृत्वाखाली गावातून कार्यकर्त्यांनी फेरी काढली. अबकी बार, प्रीतम म्हात्रे आमदार या घोषणा उरणमध्ये दिल्या जात आहेत. यावेळी महादेव, बंडाशेठ यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# माजलगाव मतदार संघाच्या विकासासाठी मोहनदादा जगताप यांना निवडून द्यावे-प्रांतध्यक्ष जयंत पाटील

**वडवणी । प्रतिनिधी**

सध्याची राज्यातील परिस्थिती पाहता राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे त्यामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील तिन्ही तालुक्याचा विकास करण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांनाच निवडून द्यावे असे आवाहन माजलगांव विधासभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांच्या वडवणी येथील प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहिर सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाचे प्रांताध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.

महाविकास आघाडीचे माजलगाव विधानसभेचे उमेदवार मोहन जगताप यांच्या प्रचारार्थ वडवणी येथे महाराणी ताराबाई महाविद्यालयाच्या प्रंगाणातील बाजरतळावर सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास भव्य सभा संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर बीडचे खा. बजरंग सोनवणे, माजी आ.बाजीराव जगताप, महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप, माजी आ. उषाताई दराडे, नारायण डक,सक्षणा सलगर,मानवी हक्क अभियानाचे प्रा.मिलींद आवाड, भिमराव हत्तिअंबिरे, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर सातपुते, हेमाताई पिंगळे, क्राँ.दत्ता डाके, दादासाहेब मुंडे, क्राँ. भाई मोहन गुंड,भाई गंगाभिषण थावरे, माजी नगराध्यक्ष साहाल चाऊस, अँड .गोले, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे,यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्वच घटक पक्षाचे नेते पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यासभेत अनेक मान्यवरांची भाषणे झाली असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून पक्षाचे प्रांतध्यक्ष जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले कि, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार उध्दव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरळीत कामकाज सुरु आसताना पक्ष फोडाफोडीचे राजकारण करत भाजपा आणि शिंदे सेना व अजित पवार गटाचा सहभाग घेत सत्ता स्थापन केली. या अडीच वर्षाच्या काळात महागाई वाढवली, सुशिक्षित बेकारांचा प्रश्न गंभीर आसताना कंत्राट पध्दतीने कंपनीच्या मांध्यमांतून तंटपुज्या पगारावर भरती सुरु केली तसेच सरकार धोक्यात येत आसताना माझी लाडकी बहिण योजना अंमलात आणली पंधराशे रुपये देवू केले अशा फसव्या योजना आणून राज्याला दिवाळखोरीत नेण्याच काम या सरकारने केले असून महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षाने यांचा विचारमय करुन आघाडीचा जाहिरनामा काढला यात महिला तीन हजार रुपये तर सुशिक्षितांना चार हजार महिना देण्यात येणार आहे. तर शेतर्क़यांची ३ नव्हे तर ४ लाखापर्यत कर्जमाफी करण्यार असल्याचे देखील सांगितले असून हा जाहिरनामा वाचा आणि महाविकास आघाडी आणि महायुतील फरक तुम्हीच पहा असे आव्हान करत आसताना आ.प्रकाश सोळंके व रमेश आडसकर यांचे नाव न घेता अप्रत्यक्ष हल्लाबोल केला पक्षाशी आणि शरदचंद्रजी पवार साहेबांच्या विचाराशी गद्दारी करर्णाय़ा उमेदवारा मतदान न करता त्यांना प्रायश्चित करण्याची संधी मतदारानी द्यावी असे आव्हान करत आसताना स्वच्छ प्रतिमेचा आणि आपला माणूस मोहन जगताप यांच्या तुतारी वाजणारा माणुस या चिन्हसमोरील बटन दाबून प्रंचड मताने विजयी करावे असे आव्हान यावेळी जयंत पाटील यांनी केले आहे.माझ्या येडेश्वरी कारखान्याने सर्वाधिक ऊसाला भाव दिला त्या पाठोपाठ माजलगांवच्या छत्रपती कारखान्याने दिला असून इथले आमदार मात्र धमक्या देत ऊस उत्पादक शेतर्क़यांना धमक्या व वेटीस धरण्याच काम केले आहे. आमच्या इकडच्या पट्याने तर कारखान्याची जमिन विकली राज्यातील हे पाहिलेच प्रकरण आहे.म्हणून मी खासदार झाल्यानंतर पहिले काम कोणते केले असेल तर धारुरच्या घाटाची दुरुस्तीची दिल्लीत तत्वता मान्यता मिळविण्याचे काम केले आहे. यामुळे या भागातील ऊस घेऊन जाण्याचे काम माझे दोन आणि मोहनदादाचा एक कारखाना घेऊन जाईल असा मत खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल आहे. विद्यमान आ.प्रकाश सोळंके वीस वर्षापासून आमदार आहेत. त्यांनी विकासाच्या फक्त निवडणुक आली फसव्या घोषणा केल्या यामध्ये वडवणीला एमआयडीसी करू म्हणाले तसेच माजलगाव येथे टेक्सटाइल करू परंतु प्रत्यक्षात काही करता आले नाही त्यांना साधे वडवणी येथे बसस्थानक करता आले नाही . पुतण्याला वारस केले आणि पुन्हा तेच उमेदवार झाले ते रक्ताचे झाले नाहीत आता मतदार संघाचे कसे होतील त्यांना आता मतदारांनी घरी बसवावे. तसेच आमचे सहकारी आडसकर यांनी पक्ष प्रवेश केला आणि दुर्सय़ाच दिवशी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. हे केजचे पार्सल त्यांना यंदा हि रिर्टन पाठवा असे आव्हाण महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांनी केले आहे.

# मी राजकारणामध्ये आमदार,खासदार या पदासाठी नसून आमदार,खासदार बनवण्यासाठी आहे:आ.पंकजाताई मुंडे

## पंकजाताई मुंडे यांनी जादूची कांडी फिरवताच मला उमेदवारी मिळाली-डॉ.योगेश क्षीरसागर

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

तालुक्यातील रायमोह येथे महायुतीचे बीडचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ मंगळवारी (दि.१२) जाहीर सभा पार पडली. यावेळी मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड.सर्जेराव तांदळे, वैजनाथ मिसाळ, वसंतराव सानप, सुधाकर मिसाळ, सलीम जहांगीर, शांतीनाथ डोरले, जालींदर सानप, अशोक लोढा, चंद्रकांत फड, देविदास नागरगोजे, बप्पासाहेब घुगे, डॉ.लक्ष्मण जाधव, अक्षय रणखांब, अनिल चांदणे, विक्रांत हजारी, अभय वनवे, सुनिल मिसाळ, विजय सरवदे, गणेश कोळेकर, अजय सवई, चंद्रकांत सानप, अशोक इंगळे, संतोष कंठाळे, हाशम शेख, दादासाहेब सानप, प्रिया ढाकणे, सुलेमान पठाण, सुभाष क्षीरसागर, सखाराम जाधव, विवेक साखरे, संग्राम बांगर, राजाभाऊ जाधव, बाबासाहेब सानप, अरूण भालेराव, गणेश घोलप यांच्यासह भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, सरपंचांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आता आपण चांगल्या माणसाला संधी द्यायची. बीडच्या जागेबाबत तिढा होता. माझं अजित दादांशी बोलणं झाल्यानंतर रात्री एक वाजून ४० मिनिटांनी फोन केला. पक्ष कोण लढणार हाच पहिला प्रॉब्लेम होता शिवसेना लढणार आहे की राष्ट्रवादी आणि त्याच्यामुळे या सगळ्या विषयातून शेवटी हे तिकीट मार्गी लागलं आणि अजित दादांनी निर्णय घेतला आणि तो निर्णय योग्य आहे असं माझं मत मी त्यांना मांडलं आणि






त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी मी आज इथे उभी आहे. अशी गणित बसली आहेत की या जिल्ह्याचा निवडणुकीचा इतिहास आपण लिहिणार आहोत. ज्या लोकांनी माझ्यासाठी खस्ता खाल्ल्यात आज त्यांच्या हातामध्ये जादूची कांडी आहे. भारतभूषण क्षीरसागर यांची आमदारकीची इच्छा पूर्ण नाही झाली तरी योगेश तुमची ही इच्छा पूर्ण होईल असा आशीर्वाद मी देते. योगेश यांनी मला एक फोन केला आणि म्हणाले ताई मी डॉक्टर आहे सर्जन आहे माझ्याकडे पैशाची काही कमी नाही मला पैशासाठी राजकारण करायचं नाही, मला राजकारण पदासाठी मसलपावर साठी करायचं नाही, माझ्यामध्ये कुठलाही दुर्गुण नाही, मला फक्त माझ्या वडिलांना जे व्हायचं होतं त्यासाठी एकदा आमदार होऊन माझ्या वडिलांची इच्छा पूर्ण करायची आहे. योगेश यांना निवडून आणायची जबाबदारी माझ्यावर आहे. कधी चुकीची फेक नरेटिव्ह, चुकीच्या पद्धतीने निर्माण केलेली लाट चांगल्या माणसाला निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर काढू शकते आणि जिल्ह्याचा विकास कोसो दूर फेकला जातो. मी तुम्हाला गॅरंटी देते योगेश क्षीरसागर यांच्यावतीने की ते कुठल्याही गावाच्या विकासामध्ये भेदभाव करणार नाहीत. त्यांच्याकडे टक्केवारी ला आणि तोडपाणीला स्थान नाही. मी गॅरंटी देते की ते नगरपालिका आणि पंचायत समितीला कार्यकर्त्यांना संधी देतील. योगेश यांनी ठरवले आहे की मी माझ्या कार्यकर्त्यांना परिवार म्हणून त्यांना संधी देईल आणि त्यामध्ये ते भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये भेदभाव करणार नाहीत. मनातून किंतु परंतु काढून टाका मी तुमच्या बाजूने त्यांच्याबरोबर उभी आहे, या भागाचा विकास मी करून दाखवणार. बीड जिल्ह्यामध्ये असा निकाल लागला पाहिजे की पूर्ण देशाने म्हणले पाहिजे की हे बीड जिल्ह्याचे लोक विकासाच्या मागे उभे राहतात. ऊसतोड कामगारांना मी हात जोडते तुम्ही वीस तारखेला मतदान करूनच कारखान्यावर जा अशी माझी विनंती आहे. वीस तारखेपर्यंत कुणीही जायचं नाही गाव सोडायचं नाही २० तारखेला मतदान करूनच जायचं. ऊस तोडून या तोपर्यंत मी आपले सरकार आणते. आपण सर्वांनी २० तारखेला घड्याळासमोरचे बटन दाबून महायुतीचे उमेदवार योगेश क्षीरसागर यांना विजयी करा आणि माझ्या विनंतीला मान द्या, असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. यावेळी अनेक पदाधिकार्यांनी मनोगत व्यक्त करून डॉ.योगेश क्षीरसागर यांना मोठ्या मताधिक्क्याने विजयी करण्याचे आवाहन केले.मी डॉक्टर असलो तरी पंकजाताई राजकारणातील डॉक्टर आहेत. आज जागतिक निमोनिया दिवस आहे. मतदारसंघात आमदारांनी पसरवून ठेवलेला निमोनिया दूर करण्याची शस्त्रक्रिया मी नक्की करेन. त्यासाठी मला एकदा संधी द्या. पंकजाताईंचे लोकसभा निवडणुकीत प्रामाणिकपणे काम केले. त्याची त्यांनी वेळोवेळी दखल घेतली. माझ्या उमेदवारीमागे एक अदृश्य शक्ती होती, असा मी मागे उल्लेख केला होता. आज जाहीरपणे सांगतो की, ती अदृश्य शक्ती पंकजाताई मुंडे ह्या होत्या. त्यांचा शब्द माझ्यासाठी अंतिम असेल. पंकजाताई मुंडे यांनी जादूची कांडी फिरवताच मला उमेदवारी जाहीर झाली. भाजप, राष्ट्रवादीसह महायुतीच्या सर्व पदाधिकार्यांना मान देईन. कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत आपण सोबत राहू. मला विजयी करून मतदारसंघाच्या विकासासाठी एक संधी द्यावी, असे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

## राऊतांनी कष्टकरी व्यापारी वर्गाची माफी मागावी अन्यथा निवडणुकीत व्यापारी तुमचा कडेलोट करतील-भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकर

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अमित शहा यांच्याविरोधात वक्तव्य करताना व्यापारी असा उल्लेख केला होता. त्यांच्या या विधानाला भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. व्यापारी आणि दुकानदार कष्ट करतात, ग्राहकांना सेवा देण्याचा प्रयत्न करतात. तोही एक कष्टकरी वर्ग आहे. राऊत यांनी कष्टकरी वर्गाचा अपमान केला असून त्यांनी दुकानदार, व्यापाऱ्यांची माफी मागावी. अन्यथा हे दुकानदार पुड्या बांधता बांधता निवडणुकीत तुमचा कडेलोट केल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशाराच दरेकर यांनी दिला आहे.

आज पत्रकार परिषदेत बोलताना भाजपा गटनेते दरेकर यांनी राज्यातील विविध राजकीय विषयांवर भाष्य करत विरोधकांवरही टिकेची झोड उठवली. या पत्रकार परिषदेला भाजपा मुंबई उपाध्यक्ष रवी राजा उपस्थित होते.



संजय राऊत यांनी सर्व्हेबाबत केलेल्या विधानांवर दरेकर म्हणाले की, सर्व्हे वेगवेगळ्या प्रकारचे असतात, त्यांचे एक अनुमान असते. निश्चितच स्वाभाविकपणे सर्व्हे महायुतीच्या बाजूने असल्याने आमचा उत्साह द्विगुणित होईल. संजय राऊत खोटं बोलण्यात विश्वविक्रम करू शकतात. सकाळी उठले की खोटं बोलायचे हा एककलमी कार्यक्रम सुरू आहे. २८८ पैकी उद्या ३०० जागा आमच्या येणार नाहीत आणि त्यांनी लढविल्या आहेत त्यापेक्षा दुप्पट जागा येणार नाहीत असे बोलले नाहीत हे आपले नशीब समजायचे, असा टोलाही लगावला.

तसेच संजय राऊतांची तीचतीच कॅसेट रिपीट होतेय. ईडी, सीबीआय या तपास यंत्रणावर गेले वर्षानुवर्ष बोलताहेत. ज्या तपास यंत्रणांचा वापर काँग्रेसने त्यांची देशात सत्ता असताना ती टिकवण्यासाठी, विरोधकांची सत्ता घालविण्यासाठी केला हे संजय राऊत विसरले आहेत. अमित शहा देशाचे नेते आहेत. त्यांनी कालही सांगितलेय तिन्ही पक्ष एकत्रित येऊन, तिन्ही नेते बसून एकविचाराने आमचा मुख्यमंत्री ठरवू. महाराष्ट्रातील जनताच मुख्यमंत्री ठरवते. तीच आमचा महायुतीचा मुख्यमंत्री बनण्यासाठी आम्हाला जनाधार देत असल्याचे चित्र राज्यभर दिसतेय, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

शिवाजी पार्क येथील मैदानावरून संजय राऊत यांनी केलेल्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले की, नियमाप्रमाणे ज्यांना मैदान देणे शक्य आहे त्यांना महापालिका, निवडणूक यंत्रणा मैदान देईल. संजय राऊत यांनी भावनिक वातावरण करू नये. बाळासाहेबांचा विचार, शिवसेना एकनाथ शिंदेंसोबत आहे. तो वारसा, विचार पुढे नेण्याचे काम एकनाथ शिंदे करताहेत. राऊत यांनी आता बाळासाहेबांच्या नावावर मतं मागण्याचे बंद करावे. तुम्ही बाळासाहेबांचा विचार मातीत घातलेला आहे. बाळासाहेबांवर प्रेम करणारा मराठी माणूस, हिंदुत्ववादी जनता तुम्हाला मतदान करणार नाही. तुमच्या भावनिक भूलथापांना बळी पडणार नाही. वणी येथे निवडणूक अधिकाऱ्यांकडून उद्धव ठाकरे यांची बॅग तपासण्यात आली. त्यावर बोलताना दरेकर म्हणाले की, उद्धव ठाकरे या देशाचे स्पेशल नागरिक नाहीत. देशातील प्रत्येक नागरिक मग तो कुणीही असो त्याची बॅग तपासण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला, यंत्रणेला आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचीही हेलिकॉप्टरमधून उतरल्यावर बॅग तपासल्याचे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेले आहे. मुख्यमंत्र्यांचीही यातून सुटका झालेली नाही. या देशात संविधानाने, लोकशाही मार्गाने निवडणूक आयोगाला तपासणीचा अधिकार दिलेला आहे. उद्धव ठाकरेंनी यात वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. अशा प्रकारे बॅगेतून काही नेत नसाल तर चिंता करायचे कारण नाही.उद्धव ठाकरेंनी केलेल्या विधानावर प्रहार करत दरेकर म्हणाले की, बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देऊन काँग्रेसच्या मांडीला मांडी लावण्याचे पाप उद्धव ठाकरेंनी केलेय. त्याचे पापक्षालन पहिले करावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी काय आहेत हे देशाला माहित आहे. बाळासाहेब आणि मोदींचे दृढसंबंध संपूर्ण देशाने, महाराष्ट्राने पाहिलेत. शब्दशा अर्थ न घेता आपण बाळासाहेबांचा वारसा चालवीणारे पुत्र म्हणून त्यांच्या विचारांचे नकलीपण जपताय. त्यांचे विचार जपत नाही. बाळासाहेबांच्या विचारधारेला विरोध केलेल्या काँग्रेससोबत साटेलोटे करताय त्या अर्थाने मोदी नकली वारसदार बोलल्याचे दरेकरांनी स्पष्ट केले. तसेच निवडणुका असल्याने प्रत्येकजण आपापल्या परीने प्रचार करतोय. हिंदुत्व, हिंदू धर्माची पताका फडकविण्यासाठी भाजपा, महायुती कटीबद्ध आहे. उद्धव ठाकरेंनी मतांच्या लाचारीसाठी तुष्टीकरण चालू ठेवावे, असा टोलाही दरेकरांनी ठाकरेंना लगावला. लाडक्या बहिणींची योजना बंद होणार नाही हे आमच्या तिन्ही नेत्यांनी सांगितलेय. आपले राज्य सरकार मजबूत आहे. आर्थिक सक्षमता आपल्याकडे आहे. पैसे उभारण्याची धमक आणि ताकद महायुतीत आहे. महाराष्ट्रातील जनता विरोधकांना सत्तेत आणणार नाही त्यामुळे त्यांनी काळजी करू नये. ही लाच नाही हा बहिणींचा सन्मान आहे. उलटपक्षी आणखी जास्तीची रक्कम देऊन महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी काय करता येईल हा पुढील टप्पा लाडक्या बहिणींसाठी महायुती सरकारचा असेल,असेही दरेकर म्हणाले.

# पवार साहेबांशी गद्दारी करणाऱ्या इंदापूरच्या आमदारांना जागा दाखवून द्या-हर्षवर्धन पाटील

## मतदारांमध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या विषयी आपुलकीची भावना

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूरचे विद्यमान लोकप्रतिनिधी हे आजपर्यंत पवार साहेबांच्या आशीर्वादावर विधानसभेला निवडून येत होते. त्यांना शरदचंद्रजी पवार साहेबांनी भरभरून दिले. तरीही पवार साहेबांशी अडचणीच्या काळात गद्दारी करणाऱ्या इंदापूरच्या आमदारांना विधानसभा निवडणुकीत मतदारांनी त्यांची जागा दाखवून द्यावी व पवार साहेबांना साथ द्यावी,असे आवाहन इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे व महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे.

हर्षवर्धन पाटील यांनी रविवारी (दि.१०) बिजवडी,वनगळी,राजवडी, गागरगाव,पोंदकुलवाडी या गावांमध्ये झंझावती प्रचार दौरा केला. या दौऱ्यात पोंदकुलवाडी (ता.इंदापूर) येथे हर्षवर्धन पाटील यांचे जोरदार भाषण झाले. हर्षवर्धन पाटील यांच्या दौऱ्यास जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यकर्त्यांमध्ये वेगळा जोश निर्माण करण्यात हर्षवर्धन पाटील यशस्वी झाल्याचे चित्र दौऱ्यात दिसून आले. विशेष म्हणजे राज्यातील सुसंस्कृत नेते असलेले हर्षवर्धन पाटील यांचे विषयी जनतेमध्ये आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.

हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, इंदापूरच्या विद्यमान आमदारांना शरद पवारांनी आजपर्यंत २५ वर्षात भरभरून पदे दिली. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पवार साहेबांनी इंदापूरला सांगता सभा घ्यावी,म्हणून प्रचंड आग्रह केला,सदरच्या सभेमुळेच विजय झाल्याचे आता विद्यमान आमदार विसरले आहेत. मात्र आम्ही राष्ट्रीय नेते, ८४ वर्षाचे संघर्ष योद्धे शरदचंद्रजी पवार साहेब यांना त्यांच्या अडचणीच्या काळात साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. पवार साहेबांची शक्ती आपल्या पाठीशी असल्याने काळजी करण्याचे कारण नाही,असे हर्षवर्धन पाटील यांनी नमूद करताच मतदारांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

जे पवार साहेबांना सोडून गेले त्यांचा समाचार घेताना हर्षवर्धन पाटील म्हणाले की,हिरोचा झिरो व झिरोचा हिरो करण्याची ताकद राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामध्ये आहे. तालुक्यातील स्वार्थी पुढारी एका बाजूला तर जनता आपल्याबरोबर आहे.ही निवडणूक मतदारांनीच आपल्या हातात घेतल्याने आपला व राज्यात महाविकास आघाडीचा विजय कोणी रोखू शकत नाही,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले देशाचे संविधान कोणी बदलू शकत नाही, अन आंम्ही ते बदलू देणार नाही,असा इशाराही हर्षवर्धन पाटील यांनी दिला.

यावेळी पक्षाचे इंदापूर तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील यांनी भाषणात सांगितले की,तालुक्याच्या लोकप्रतिनिधींनी ठराविक ठेकेदारांना घेऊन १० वर्षात रस्ते आणि कमिशन मधून मलिदा गोळा करण्याशिवाय दुसरे काम केलेले नाही.एकही दूध डेअरी, कारखाना काढला नाही.उलट विद्यमान लोकप्रतिनिधींनी हर्षवर्धन पाटील यांचे कारखाने कसे अडचणीत येतील यासाठी प्रयत्न केले,याचे आंम्ही साक्षीदार आहोत,कारण हर्षवर्धन पाटील यांचेविषयी शेतकऱ्यांमध्ये चीड निर्माण व्हावी,वातावरण गढूळ व्हावे,असा विद्यमान लोकप्रतिनिधींचा प्रयत्न होता. विद्यमान लोकप्रतिनिधी हे गोड बोले व विश्वासघातकी माणूस आहे,अशी टीका महारुद्र पाटील यांनी केली.

कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याचे संचालक छगन भोंगळे यांनी आपल्या जोरदार भाषणात सांगितले की, विद्यमान लोकप्रतिनिधींनी कोणालाही रोजगार दिला नाही, खडकवासल्याचे पाणी आले नाही, उलट त्यामुळे कॅनॉल बुजत चालला आहे. खडकवासला कालव्याला पाणी आणण्यासाठी हर्षवर्धन पाटील यांनाच विजयी करा, असे आवाहन छगन भोंगळे यांनी केले.

यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड. तेजसिंह पाटील, अशोक घोगरे, प्रा. कृष्णाजी ताटे, हिरालाल पारेकर, संदीप कडवळे, मंगेश डोंगरे निलेश देवकर आदीसह पदाधिकारी,कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक सय्यद पठाण यांनी केले. त्यात त्यांनी विरोधकांवर शेलक्या शब्दात टीकास्त्र सोडले.यावेळी हर्षवर्धन पाटील यांचा सत्कार मच्छिंद्र अभंग,नाना पोंदकुले,ज्ञानदेव भोंगळे,मेहबूब पठाण, मेजर खंडू बोराटे,पप्पू पोंदकुले आदींनी केला.तत्पूर्वी,कार्यकर्त्यांनी काढलेल्या दुचाकी रॅलीत हर्षवर्धन पाटील यांनी सहभाग घेतल्याने,कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# हजारो नव उद्योजक घडवण्यात अनुराधा चव्हाण यांचा सिहांचा वाटा :नरेंद्र पाटील

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठा समाजासाठी सुरु करण्यात आलेल्या सारथी संस्थेमुळे अनेक मराठा तरुण हे आज सरकारी नोकरीत मोठ्या हुद्द्यांवर आहेत. तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामुळे जिल्ह्यातील ११ हजार पेक्षा अधिक मराठा तरुण हे आज नोकरी मागणारे नाही तर नोकरी देणारे झाले आहे. मात्र मराठवाड्याच्या बहुतांशी भागात या योजनांचा लाभ घेण्यासाठी तरुणांना अडचणी येत होत्या. त्या सोडवण्यासाठी मराठा नव उद्योजकांना अनुराधा चव्हाण यांची मोलाची साथ मिळाली. चव्हाण आमदार झाल्यास हजारो नव उद्योजक उभे राहतील, असे प्रतिपादन अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. सोमवारी (दि. ११) रोजी कन्यादान लॉन्स सावंगी येथे आयोजित युवा संवाद मेळाव्यात बोलत होते.मतदार संघात नव मराठा तरुण उद्योजक घडवण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाचा लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोचविण्यासाठी कार्यालयात एखादा स्वतंत्र अधिकारी नेमणे असेल किंवा राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज वितरणात चालढकल होत असल्याबद्दल तरुणांची असलेली नाराजी दूर करून कर्ज मिळवून देणे. बँकांनी गरजू लाभार्थींची अडवणूक टाळण्यासाठी कामात सुलभता आणण्यासाठी त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचे काम केले. मतदार संघातील तरुण नोकऱ्या मागणारे नव्हे तर नोकऱ्या देणारे झाले पाहिजेत असे ध्येय मनाशी मी बाळगले असून आता मला फक्त तुमची साथ हवी आहे, असे आवाहन अनुराधा चव्हाण यांनी केले.पुढे बोलताना नरेंद्र पाटील म्हणाले की, महायुती सरकारमध्ये मराठा समाजासाठी विविध योजना काढल्या त्यातून अनेक तरुण घडले. राज्यात १ लाख मराठा तरुण उद्योजक बनविण्याच्या संकल्पपूर्तीचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ११ हजार पेक्षा अधिक तरुणांना उद्योजक बनवले आहे.फुलंब्री मतदारसंघात सर्वाधिक उद्योजक बनवले आहे.मी मराठवाड्यातील जालना, लातूर,नांदेड,बीड,परभणी, छत्रपती संभाजीनगर अशा विविध जिल्ह्यात फिरतो आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077